वर्ष : १३ ❑ अंक : ७
सौर आषाढ, शके १९३६
(जून, २०१४)
वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं
# गतिमान संतुलन
संपादक : दिलीप कुलकर्णी

**भूमिका**
'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही विकासनीती' ह्यांचा पुरस्कार करणारं, त्या दृष्टीनं विचार आणि कृति-कार्यक्रम पुढे ठेवणारं हे माध्यम आहे. आत्मपरिवर्तनाच्या ह्या प्रयत्नांत आपणही सहभागी व्हा आणि इतरांनाही सहभागी करून घ्या.

## अच्छे दिन : पर्यावरणासाठीही?

**भा**रतीय जनतेनं केलेल्या भरघोस मतदानामुळे नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालचं सरकार गेल्या महिन्यात सत्तेवर आलं. 'अच्छे दिन आनेवाले हैं' असं आश्वासन देत मोदींनी जनतेला आपल्या बाजूला बळवलं, नि कधी नव्हे इतक्या जागा मिळवत भाजपप्रणीत आघाडी लोकसभेत राज्यकर्ती झाली.

मनमोहनसिंह सरकारची निष्क्रियता, भ्रष्टाचार अशा मुद्द्यां-बरोबरच विकासाची कमी झालेली गती हा मोदींच्या प्रचारातला एक प्रमुख मुद्दा होता. गुजरातचे मुख्यमंत्री असण्याच्या काळात मोदींनी त्या राज्याचा प्रचंड विकास केला असं वारंवार जनतेच्या मनावर ठसवलं गेलं; आणि 'मोदी पंतप्रधान झाले की, संपूर्ण भारताचा असा विकास होईल' असं सांगितलं गेलं. जनतेला असा विकास हवाच आहे, नि त्यामुळे तिनं भाजपच्या पारड्यात आपली मतं टाकली.

मोदींविषयी भारतीय जनतेच्या मनात ह्या ज्या आशा निर्माण झाल्या आहेत, त्या ते पुऱ्या करू शकतील की नाही हे काळच सांगेल : आत्ता त्याविषयी काहीही बोलणं-लिहिणं अनुचित ठरेल. तथापि, आपली कार्यक्षमता सिद्ध करून ते 'यशस्वी' झाले, तर ५-१० वर्षांनी भारताची स्थिती कशी असेल, ह्याचा अंदाज करणं; लोकांना त्याबाबत सावध करणं हे अनुचित ठरणार नाही : किंबहुना, ते आवश्यक आहे.

आपण प्रथमच हे लक्षात घेतलं पाहिजे की, मोदींची विकासाची संकल्पना ही मनमोहनसिंहांच्या संकल्पनेपेक्षा जराही वेगळी नाही. शेती, उद्योग आणि सेवा ह्या तिन्ही क्षेत्रांतल्या वाढीला प्रोत्साहन देऊन देशाचं एकूण राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) वाढवणं, आणि ह्या वाढीचा वेगही (ग्रोथ रेट) सतत वाढता ठेवणं ही 'विकासा'ची प्रचलित संकल्पना आहे. सरकारीकरण, सुस्त आणि कामचुकार नोकरशाही, सार्वत्रिक भ्रष्टाचार ह्यांमुळे १९९० पर्यंत असा विकास वेगानं होण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे १९९१मध्ये नरसिंहरावांच्या सरकारात अर्थमंत्री असताना मनमोहनसिंहांनी खासगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण ह्या त्रिसूत्रीच्या आधारे विकासाला गती देण्याचा कार्यक्रम सुरू केला. महत्त्वाचं म्हणजे वाजपेयींच्या सरकारानंही विकासाचं तेच प्रतिमान पुढे चालवलं. २००४मध्ये मनमोहनसिंहच पंतप्रधान झाले, आणि २००४ ते ९ ह्या काळात त्यांना अभिप्रेत असलेला विकास बऱ्यापैकी साध्य होत गेला. ए.रा.उ. वाढत गेलं नि विकासदरही चढा राहिला. मात्र, २००८मधल्या मंदीनंतर विकासदराला उतरती कळा लागली. तो वाढवण्यात आलेलं अपयश, भ्रष्टाचार, घोटाळे ह्यांमुळे सरकारची अवस्था केविलवाणी होऊन अखेर ते पडलं.

आता मोदी ही परिस्थिती सुधारतील असं म्हटलं, तरी अंतिमत: जो 'विकास' ते करू पाहत आहेत, तो वरच्यापेक्षा जराही वेगळा असणार नाही, हे आपण सदैव लक्षात ठेवायला हवं. 'आपण हा विकास कसा साध्य करणार' हे त्यांनी अजून तपशिलात सांगितलेलं नसलं, तरी त्यांना 'खा-उ-जा धोरण'च अधिक जोमानं राबवावं लागणार, हे निश्चित आहे. हे धोरण मुख्यत्वे राबवलं जाईल ते उद्योगक्षेत्रात. शेतीतलं उत्पादन एका मर्यादेबाहेर वाढू शकत नाही, कारण ती प्रक्रियाच मूलत: सेंद्रिय आहे. तरीही कृषि-उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढवलं गेलंच, तर मग जमिनींच्या नापीकपणाची फार मोठी किंमत भारताला मोजावी लागेल. कीटकनाशकांमुळे हवा-पाणी-जमीन मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होण्याची किंमत मोजावी लागेल. अन् तरीही ह्या वाढीला एक अपरिहार्य मर्यादा राहीलच.

औद्योगिक उत्पादनांच्या वाढीवर—ती यांत्रिक प्रक्रिया असल्यानं—अशी मर्यादा नसते. (असं मानलं जातं.) नैसर्गिक संसाधनं, ऊर्जा-संसाधनं, अर्थ-संसाधनं आणि मानव-संसाधनं ह्यांचा निवेश (input) वाढवला की, गणिती प्रमाणात उद्योगांचं उत्पादन (output) वाढतं. म्हणूनच एकूण राष्ट्रीय उत्पन्नातल्या वाढीमधला सर्वाधिक हिस्सा हा औद्योगिक उत्पादनवाढीचा असतो. मोदींनी गुजरातचा विकास केला, तो ह्याच प्रकारे. राज्यात उद्योग यावेत ह्यासाठी त्यांनी शिस्तशीर प्रयत्न केले; त्यात असणाऱ्या प्रशासकीय अडचणी दूर केल्या; उद्योगांना विविध सुविधा प्राधान्यानं पुरवल्या. आता संपूर्ण देशभर हेच धोरण ते राबवतील ह्यात शंका नाही.

औद्योगिक वाढीमुळे सेवाक्षेत्राच्या वाढीलाही चालना मिळेल. बँका आणि अन्य वित्तीय संस्था, माहिती तंत्रज्ञान, संपर्क, वाहतूक, पर्यटन अशा विविध क्षेत्रांची वाढ होईल. १९९१नंतर ही सर्व क्षेत्रं किती फुगली हे आपण पाहतोच आहेत. मोदींच्या राजवटीत हा फुगा आणखी फुगेल.

ह्या वाढीमुळे रोजगार वाढतील. जनतेची क्रयशक्ती वाढेल. बाजारपेठेचा विस्तार झाल्यानं वस्तू आणि सेवांचा पुरवठा वाढणार आहेच. त्यांच्यासाठी ग्राहक हवेत. क्रयशक्ती वाढलेला गट ती गरज पुरी करेल. त्यांना विविध गोष्टी मनसोक्त उपभोगायला मिळून त्यांचा सुख-भाव वाढेल. अशा प्रकारे 'अच्छे दिन आनेवाले हैं' हे सांगत मोदींनी दिल्लीचा गड सर केला.

तथापि, प्रत्यक्षात हे असं होण्याची शक्यता किती आहे? हा प्रश्न मनात येण्याची वेळ येते, कारण 'अच्छे दिन'च्या ह्या रेखीय तर्कशास्त्रात त्यातून उद्भवणाऱ्या सामाजिक आणि पार्यावरणिक समस्यांची जाणीव असलेली दिसत नाही. १९९१पासूनच्या ह्या तऱ्हेच्या विकासामुळे सामाजिक विषमता किती वाढली आहे; नाहीरेंची स्थिती अधिकाधिक दयनीय होत असताना आहेरे हे अति-आहेरे कसे बनत आहेत हे आपण गेल्या अंकात सुरू झालेल्या लेखमालेत वाचलंच. विकास अधिक होऊन 'अच्छे दिन' जितके अधिक येतील, तितकी ही विषमतेची दरी रुंदावणार आहे. ह्यातून जो सामाजिक असंतोष वाढेल, त्याचा विचार झाल्याचं दिसत नाही. विकासासाठी खनिजं लागणार, कोळसा लागणार. ही साधनसंपत्ती जंगलांखालील जमिनीत असेल, तर त्यासाठी सरकार जंगलं उद्ध्वस्त करणार का? समजा केली, तर जंगलांच्या आधारे जगणाऱ्या आदिवासींचं काय? त्यातून नक्षलवाद वाढला तर काय? उद्योगीकरणामुळे रोजगारांच्या आशेनं ग्रामीण जनतेचं स्थलांतर होऊन शहरं फुगत जातात. भारतीय शहरांमधील निम्मी लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते; अशा वेळीं स्थलान्तरितांचे हे नवे लोंढे कुठे-कसे राहतील? त्यांचं जगणं माणूसपणाला साजेसं असेल का? आधुनिक उद्योगीकरण हे ऊर्जा-सघन, तंत्रज्ञान-सघन असं असतं. गुंतवणुकीच्या मानानं त्यातून खूप कमी रोजगार उपलब्ध होतात. मग अशा वेळीं रोजगाराच्या आशेनं शहरांत आलेल्या तरुणांचं काय होईल? कितींना रोजगार मिळेल? बेकारी किती वाढेल? 'विकासा'मुळे सर्व जगभर अशा समस्या निर्माण झालेल्या आहेत. भारतात तर प्रचंड लोकसंख्या ही समस्या आहेच. सहा दशकांच्या विकासानंतरही निम्मी जनता दारिद्र्यरेषेखालीच आहे. अधिक विकासामुळे ही स्थिती अधिकच वाईट होणार नाही का? 'विकासा'ची ही गतिकी लक्षात घेतल्यास 'अच्छे दिन' कसे काय येणार हे कळत नाही. हां, काही आहेरेंसाठी ते निश्चित येतील : सर्व जनतेसाठी मात्र नाही!

अन् निसर्गाचं काय?—त्याची अवस्था तर माणसांहून वाईट होईल! सर्व संसाधनांसाठी त्याचं शोषण होणार; ऊर्जा आणि रसायनांच्या अतिरेकी वापरामुळे हवा-पाणी-जमीन प्रदूषित होणार. उद्योगांना युरोप-अमेरिका-चीन ह्यांच्याशी स्पर्धा करायची असल्यानं प्रदूषण, कामगारांची सुरक्षितता वगैरेंबाबतची बंधनं शिथिल करावी लागणार. मुळात उद्योगांना अनिर्बंध स्वातंत्र्य हवंच असतं. आता तर काय : 'विकासा'ची महान जबाबदारीच त्यांच्यावर आहे! उगीच का त्यांनी निवडणुकीत एवढी प्रचंड गुंतवणूक केली!

माझा गुजरातसंबंधीचा एक वैयक्तिक अनुभव सांगतो. सुमारे ५-६ वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. नाशकातल्या 'जीवन उत्सवा'तलं व्याख्यान झाल्यावर मी, पौर्णिमा, सृजन आणि मंदार देशपांडे असे चौघं जण रात्रीच्या थेट गाडीनं साकव्याला सोनेजींकडे चाललो होतो. रात्री केव्हातरी गाडी महामार्गावरून धावू लागली नि काही वेळानं रसायनांचा भयंकर उग्र वास येऊ लागला. गुदमरल्यासारखं झाल्यानं खिडकी उघडावी असं वाटून हात काचेपाशी नेला अन् थबकलो. बाहेर सर्वत्र तोच विषारी धूर कोंदून राहिला होता. थंडीच्या दिवसात खालची हवा गार असल्यानं अभिसरण होत नाही, आणि असा chemical smog जमिनीजवळ साचून राहतो. काच उघडून ते प्रदूषण आत घेण्याची माझी काही हिंमत झाली नाही. रासायनिक उद्योगांचं ते औद्योगिक क्षेत्र संपेपर्यंत तो वास सहन करत मी कसाबसा बसून राहिलो. त्याच वेळीं मनात हा विचार आला होता की, गुजरातचा मोदींनी केलेला 'विकास' अशा प्रकारचा असेल, तर देवच गुजरातचं भलं करो!

आता तर मोदी भारताचा विकास करायला सज्ज झाले आहेत. तो विकास हा गुजरातच्या विकासाचीच वाढीव आवृत्ती असणार ह्यात शंका नाही. म्हणजेच हा विकास पर्यावरणाचा विनाश करतच अस्तित्वात येणार आहे. युरोप-अमेरिकेनं त्यांच्या देशातले असे प्रदूषणकारी उद्योग चीनमध्ये हलवले. चीनला आर्थिक-औद्योगिक विकास साधायचा होताच; त्यामुळे त्यानं मानवाधिकार, पर्यावरण ह्यांची जराही तमा न बाळगता त्या उद्योगांचं स्वागत केलं. आपणही त्याच वाटेनं पुढे जाणार, असं दिसतं.

युरोप-अमेरिका ह्यांना वसाहतवाद गाजवायला तिसरं जग होतं. चीन-जपानला आफ्रिका, आग्नेय आशिया होता. भारताला असं कुणीच नाही. विकास मात्र त्यांच्यासारखाच हवा आहे. त्यामुळे आपल्याच देशातल्या 'चौथ्या जगा'वर भारत वसाहतवाद गाजवणार, हे उघड आहे. ह्या चौथ्या जगातली माणसं कदाचित आवाज उठवतील—हातात शस्त्र घेतील. निसर्गाचं काय? 'विकासा'साठी आपण त्याला कायम हरवतच राहणार? त्याच्यासाठी 'अच्छे दिन' असणारच नाहीत?

आज तरी ह्या प्रश्नांची उत्तरं, दुर्दैवानं, 'हो' अशीच द्यावी लागतील. पर्यावरणाचं शोषण-प्रदूषण-विनाश करूनच विकसित होण्याची स्पर्धा साऱ्या जगात चालू आहे. भारतालाही अगतिकतेनं त्या स्पर्धेत सहभागी व्हावं लागत आहे. वाईट ह्याचंच वाटतं की, आपण अगतिकतेनं तीत जितके सहभागी होत आहोत, त्याहून अधिक स्वेच्छेनं सहभागी होत आहोत. निसर्गाला हरवून स्वत: जिंकण्याचा आत्मघातकी मूर्खपणा स्वेच्छेनं करत आहोत.

एक गोष्ट आपण सदैव ध्यानात ठेवू या : निसर्गाची हानी करून येणारे 'अच्छे दिन' कधीही टिकाऊ नसतात. तो 'विकास' कधीही धारणक्षम नसतो. मुळात, 'औद्योगिक वाढ अनिर्बंधपणे होऊ शकते' हा एक भ्रमच आहे : नैसर्गिक संसाधनं, ऊर्जा-संसाधनं ह्यांच्या उपलब्धतेला निसर्गाची एक अपरिहार्य मर्यादा राहतेच राहते.

आपण सतत प्रयत्नशील असलं पाहिजे ते पर्यावरणासाठीच्या 'अच्छ्या दिनां'साठी. विकासनीतीतून हे होणं आता आणखीनच अवघड बनलंय. जीवनशैलीतून असे प्रयत्न करणं हे मात्र निश्चितपणे शक्य आहे. किमान ते तरी करूयाच करू या.

**अलीकडेच प्रकाशित झालेली ही पुस्तकं वाचलीत का?**

*राजहंस प्रकाशन*

❑ **ऊर्जा-संयम** : संयमित ऊर्जा-वापरातून धारणाक्षम विकासाकडे नेणाऱ्या जीवनशैलीची मांडणी । दिलीप कुलकर्णी । रु.१००

❑ **हरित साधक** : स्वास्थ्य, आंतरिक विकास आणि पर्यावरण-संतुलन ह्यांसाठी जीवनशैलीत परिवर्तन केलेल्या असामान्य सामान्यांचा परिचय । संकलित । रु.१००

❑ **बदलू या जीवनशैली** (२ भाग) : 'गतिमान संतुलना'तील निवडक संपादकीयांचं संकलन । दिलीप कुलकर्णी । रु.८० प्रत्येकी

*संतुलन प्रकाशन*

❑ **जोपासना घटकत्वाची** : आधुनिक पदार्थविज्ञानातून उदयाला आलेल्या प्रणाली-दृष्टिकोणाची पर्यावरणाच्या परिप्रेक्ष्यात मांडणी । दिलीप कुलकर्णी । रु.१०

❑ **उगम आणि शेवट** : वापरातल्या वस्तूंविषयी मार्गदर्शन । पौर्णिमा कुलकर्णी । रु.१०

*ही सर्व पुस्तकं पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक इथे उपलब्ध असतात. दूरभाष : २४४५ ६९०८, २४४६ २२६८*

## 'जीत-हार' ते 'जीत-जीत' १०

**दिलीप कुलकर्णी**

गेल्या लेखांकात आपण खासगी गाड्या हा 'जीत-हार खेळ' कसा आहे हे पाहिलं. तो लेख वाचल्यावर एका वाचकानं अशी माहिती दिली की, 'सिंगापूरमध्ये गाड्यांच्या एकूण संख्येवर एक मर्यादा घालण्यात आलेली आहे. नव्या गाड्या विकत घेता येतात : पण जितक्या संख्येनं जुन्या गाड्या बाद होतात, तितक्याच नव्या गाड्या रस्त्यावर येऊ शकतात. परिणामी, गाड्यांची एकूण संख्या तेवढीच राहते.'

हे एका प्रकारे खासगी गाडीवाल्यांना स्वैच्छिक हार पत्करायला लावणं आहे; नि त्यातूनच तो खेळ 'जीत-जीत' असा होतो. आपल्याकडे असं कोणतंही बंधन नसल्यानं गेल्या वीस-पंचवीस वर्षांत अतिरेकी प्रमाणात गाड्या रस्त्यांवर आलेल्या आहेत नि त्यामुळे सर्वांचीच हार होते आहे. नव्या गाड्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर यायच्या तर रस्त्यांची रुंदी त्या प्रमाणात वाढवावी लागते. त्यांच्या पार्किंगसाठी रस्त्यांवर, निवासी वा कार्यालयीन इमारतींच्या आवारात, बस/रूळगाडी-स्थानकांवर मोठ्या रिकाम्या जागा निर्माण कराव्या लागतात. भक्कम शुल्क आकारावं लागतं. नियम न पाळल्यास मोठा दंड करावा लागतो. आपल्याकडे ह्या पूरक बाबींची पूर्तता न झाल्यानं काय भयानक परिस्थिती निर्माण झाली आहे हे आपण बघतोच आहोत. काही ठिकाणी रस्त्यांची रुंदी वाढली हे खरं असलं (जीत), तरी गाडीवाले ती सार्वजनिक जागा निजी वाहनं उभी करण्यासाठी रात्रंदिवस वापरतात, नि परिणामत: रस्त्याची रुंदी कमीच होते (हार). युरोप-अमेरिकेत अशी रस्त्यावर वाहनं उभी करून ठेवायची असतील, तर शुल्क भरावं लागतं (हार); पण, आपल्याकडे सगळंच चकटफू! त्यामुळे, मागच्या लेखांकात म्हटल्याप्रमाणे खासगी गाडीवाल्यांची जीत आणि समाजाची हार असा 'जीत-हार खेळ'च सदैव चालू असतो. रस्त्यांचं रुंदीकरण, सडकांचं डांबरीकरण, वाहनांचं वाढतं प्रदूषण ह्यात (काही) माणसांची जीत असली, तरी निसर्ग मात्र सदैव हरतच असतो.

अर्थात खासगी गाडीवाल्यांची अशी जीत भ्रामकच असते. रस्त्यावर खासगी गाड्यांमुळे वाहनांची गर्दी झाली की, त्यांनाच त्याचा त्रास होऊ लागतो : वाहतुकीचा वेग कमी होतो; अपघाताची शक्यता/भीती वाढत राहते; वाहतूक तुंबण्याचं प्रमाण वाढतं; सिग्नलपाशी अधिक वेळ थांबावं लागतं, इत्यादी. ह्या सगळ्यामुळे वाहन चालवणं हे तणाव निर्माण करणारं होऊ लागतं. ही हार उत्तरोत्तर वाढतच जाते.

ह्या खेळाचं रूपांतर 'जीत-जीत खेळा'त करायचं, तर सार्वजनिक वाहतूक सबळ करणं ह्याला पर्याय नाही. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणं ही स्वैच्छिक हार असते. आणि जितके अधिक नागरिक अशी हार स्वीकारतात, तितकी सर्वांची जीत वाढत जाते. (मात्र ही जीत माणसांची : निसर्गाची नव्हेच!) ह्या स्वैच्छिक हारीमध्ये कोणकोणत्या कृतींचा समावेश होतो हे पाहणं उद्बोधक ठरेल :

पहिली हार असते वेळेच्या बाबतीतली. बस किंवा उपनगरी गाडी (लोकल) गाठायची, तर घरून लवकर निघावं लागतं. थांब्यावर वा स्थानकावर प्रतीक्षा करत थांबावं लागतं. ह्या गाड्या थांबत-थांबत प्रवास करतात. ह्या सगळ्यात वेळ अधिक जातो. समाजाची जीत व्हावी म्हणून व्यक्तींना ही अधिक वेळ खर्च करण्याची हार स्वीकारावी लागते. शिवाय, हे प्रवास गर्दीचे असतात. बसायला जागा मिळण्याची शाश्वती नसते. वाटेत कुठे थांबावंसं वाटलं, तर तेही शक्य नसतं. मार्ग ठरावीकच असतात : त्यांत लवचीकता नसते. व्यक्तिगत सुखसोयी, इच्छा, स्वातंत्र्य ह्यांची ही किंमत सार्वजनिक वाहनातून प्रवास करताना मोजावीच लागते. ही झाली व्यक्तींची हार. पण, त्यामुळे समाज जिंकतो : दरडोई इंधन कमी लागतं. दरडोई प्रदूषण घटतं. तेवढ्याच प्रवाशांसाठी रस्त्यावरची खूप कमी जागा व्यापली गेल्यानं वाहनांची गर्दी कमी होते. पार्किंगसाठी लागणारी जागाही वाचते. अशा सार्वजनिक वाहनांचा प्राय: पूर्ण वापर होतो. (उपनगरी गाड्यांचा वापर तर पूर्णाहूनही अधिक होतो!) ह्यांपैकी अनेक बाबींमुळे निसर्गावरचा भार कमी होऊन त्याचीही जीत होते.

अशा ह्या सार्वजनिक वाहतुकीत व्यक्तींचीही जीत होईल अशा काही सुधारणा झाल्या आहेत वा आता होत आहेत. उदाहरणार्थ, मुंबईतल्या 'फास्ट लोकल'. त्यांचा वेग अधिक राहतो, नि त्यामुळे प्रवासाचा वेळ बराच कमी होतो. किंबहुना, उत्तम उपनगरी सेवेमुळेच मुंबईतल्या खासगी वाहनांची संख्या त्या मानानं कमी आहे. किंवा वाहन असलं, तरी रस्त्यावरची गर्दी, नियंत्रक दिवे ह्यांना तोंड देण्यापेक्षा अनेक जण लोकलनं तणावरहित प्रवास करणं पसंत करतात. बसगाड्यांचा प्रवास वेगानं व्हावा म्हणून आता BRT (बस रॅपिड ट्रँझिट) ही संकल्पना अनेक मोठ्या शहरांत राबवली जात आहे. रस्त्यावरच्या दोन पट्ट्या बससाठी राखून ठेवणं ही बाबच खासगी वाहनधारकांना सक्तीनं हार स्वीकारायला लावणारी, नि म्हणून स्वागतार्ह आहे. आपल्याकडे अर्धवटपणा, भ्रष्टाचार ह्यांमुळे ही व्यवस्था काही शहरांत अपुरी, त्रासदायक असली, तरी अनेक देशांमध्ये ती उत्तम प्रकारे चालवली जात आहे, नि प्रवाशांमध्ये ती लोकप्रिय आहे. ज्यांना परवडतात अशांसाठी मेट्रोसारखे महागडे पर्यायही आता महानगरांत उपलब्ध होत आहेत.

शहरान्तर्गत वा उपनगरी वाहतुकीसाठी बस-लोकल हे चांगले पर्याय असले, तरी ते सर्वत्र उपलब्ध नसतात. अशा ठिकाणी सायकलरिक्षा वा ऑटोरिक्षा हे पर्याय उपलब्ध असतात. मोठ्या शहरांत टॅक्सीही असतात. सार्वजनिक वाहतुकीचा हा प्रकार बसपेक्षा अधिक महाग असतो; तथापि तो अधिक प्रवासीस्नेहीही असतो. रिक्षा दारापर्यंत येते नि दारात नेऊन सोडते. त्यामुळे थांबा/स्थानकापर्यंत चालत जाणं, वाट पाहणं, गर्दी, धक्के हे सर्व टळू शकतं. अर्थात, ह्याची अधिक किंमत मोजावी लागते. तरीही, 'खासगी गाडीतून प्रवास' ह्यापेक्षा 'सार्वजनिक वाहनातून खासगीसदृश प्रवास' हा पर्याय अधिक चांगला. त्यात समाजाच्या जितीचा काही अंश समाविष्ट असतो.

बाहेरगावी जाण्यासाठी तर बस/रूळगाडी हीच वाहनसेवा सर्वोत्तम. महाराष्ट्रातली एस्टीची सेवा बऱ्यापैकी विस्तृत आणि खात्रीची आहे. त्या गाड्यांची स्थिती आता चांगली असते; त्या आरामदायी असतात; इंजिनाचा आवाज कमी होतो; आता त्यांत 'उलटी सीट' नसते; त्या प्राय: वेळेवर सुटतात; अगदी घरबसल्याही त्यांचं आरक्षण करता येतं. हे सर्व म्हणजे प्रवाशांची अधिकाधिक जीत. ह्या सोयी सुविधांमुळे प्रवाशांची संख्या वाढून एस्टीचीही जीत होते.

आपण एस्टीत बसलो की, तिथेही अनेक 'जीत-हार खेळ' चाललेले आपल्याला दिसतात. आपली एकूणच मनोवृत्ती 'स्वत: जिंकणं आणि इतरांना हरवणं' अशी असल्यानं असं होणं अपरिहार्य आहे. पहिला 'जीत-हार खेळ' म्हणजे रांग न लावता बसमध्ये घुसणं. ह्या खेळात तरुण-दांडगट व्यक्ती जिंकतात, नि वृद्ध माणसं, महिला, मुलं ही सदैव हरतात. त्यांना शेवटी गाडीत चढावं लागतं, नि म्हणून बहुतेकदा उभं राहावं लागतं. म्हणजे 'सक्षम व्यक्तीनं आरामात बसणं आणि अक्षम/दुर्बलानं उभं राहणं' अशी ह्या खेळाला एक अन्यायाची धार आहे. एखाद्यानं स्वत: उठून वृद्ध व्यक्तीला बसायला जागा दिली की, तो खेळ लगेच 'हार-जीत' असा होतो. ही स्वैच्छिक हार उभं राहणाऱ्यालाही कर्तव्यपूर्तीचा उन्नत आनंद देते, नि बसलेल्या वृद्धाचा/लहान मूलवाल्याचा दुवाही त्याला मिळतो : म्हणजेच तो खेळ 'जीत-जीत' असा होतो.

एस्टीत पुढच्या आसनाच्या भिंती-जवळच्या कोपऱ्यात थुंकणं-पिचकारी टाकणं असा एक गलिच्छ जीत-हार खेळ भारतात सर्वत्र चालतो. थुंकणारा जिंकतो आणि शेजारचे प्रवासी हरतात. हाच प्रकार उलटीच्या बाबतीत होतो. ज्यांना थुंकायचंय; किंवा ज्यांना उलटी होते अशांनी स्वत:जवळ एक प्लॅस्टिकची पिशवी बाळगली, तर ती स्वैच्छिक हार ही इतर प्रवासी जिंकण्यास उपयोगी पडते.

प्रवास करताना मोबाईलच्या स्पीकर-वरून गाणी ऐकणं हा अनेकांचा छंद असतो. 'इतर प्रवाशांना ह्याचा त्रास होत असेल का' हा विचारही त्यांच्या मनात येत नाही. हाही एक जीत-हार खेळच. तो 'जीत-जीत' खेळात रूपांतरित व्हायचा, तर पुन्हा स्वैच्छिक हार हाच त्यावरचा उपाय आहे : गाणी ऐकणाऱ्यानं स्वत:च्या कानांत ईअरफोन घालून ती ऐकणं.

प्रवासाशी संबंधित अशा आणखी काही खेळांचा विचार पुढच्या लेखांकात करू या. ☯

*(क्रमश:)*

***ई-ग.सं.हवाय?—ई-पत्ता कळवा.***

## भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय २

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. साऱ्या विकासनीतीची ह्या अनुषंगानं पुनर्रचना केली गेली.*

*दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं?*

*अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा आकडेवारीच्या आधारे शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद 'कल्पवृक्ष'च्या सौजन्यानं आणि अनुमतीनं क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.*

### पर्यावरणाची स्थिती

❑ अलीकडेच प्रकाशित झालेल्या एका वृत्तान्तानुसार भारताचं पार्यावरणिक पदचिन्ह जगात तिसऱ्या क्रमांकाचं आहे. सर्वांत मोठं पदचिन्ह आहे अमेरिकेचं, नि दुसऱ्या क्रमांकावर आहे चीन. देशात धारणाक्षम पद्धतीनं उपलब्ध होऊ शकतात त्याच्या दुप्पट नैसर्गिक संसाधनं भारतीय वापरत आहेत. गेल्या चारेक दशकांत माणसांना पोसण्याची निसर्गाची क्षमता वेगानं घटून जवळपास निम्मी झाली आहे.

❑ देशातल्या सर्वांत गरीब ४०% जनतेपेक्षा सर्वांत श्रीमंत ०.०१% भारतीयांचं पार्यावरणिक पदचिन्ह ३३० पटींनं मोठं आहे. एखाद्या औद्योगिकदृष्ट्या विकसित, संपन्न अशा देशातल्या नागरिकाच्या सरासरी पदचिन्हाच्याही ते १२ पट आहे. सर्वांत श्रीमंत अशा १% भारतीयांचं पदचिन्ह हे संपन्न देशातल्या एखाद्या नागरिकाच्या दोन-तृतीयांश आहे; तर सर्वांत गरीब ४०% भारतीय जनतेपेक्षा ते १७ पट मोठं आहे. म्हणजेच, ज्याच्याकडे मोटारगाडी आणि लॅपटॉप आहे असा भारतीय हा जवळपास १७ गरीब भारतीयांइतकी संसाधनं वापरतो. हा वापर २.३ 'विश्व-नागरिकां'च्या संसाधन-वापराइतका आहे. (जगातल्या नागरिकांचं सरासरी दरडोई उत्पन्न २००७मध्ये सुमारे १०,००० डॉलर होतं.)

❑ पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या, २००९च्या, 'पर्यावरणाची स्थिती' ह्या अहवालात म्हटलेलं आहे : 'वातावरणातील संभाव्य बदलांमुळे भारताची अन्नसुरक्षा धोक्यात येऊ शकते. दुष्काळ आणि महापुरांची वाढती संख्या आणि तीव्रता ह्यांमुळे लहान आणि सीमान्त शेतकऱ्यांच्या कृषिउत्पादनावर दुष्परिणाम होईल.' संपूर्ण देशातलं धान्योत्पादन लक्षणीयरीत्या घटण्याची शक्यता आहे.

❑ जागतिक कर्बोत्सर्जनातला भारताचा वाटा सध्या जवळपास ८% आहे. वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे तो प्रतिवर्षी वाढत आहे. हाच वेग कायम राहिला, तर भारताचा दरडोई कर्बोत्सर्ग २०३०पर्यंत तिप्पट होईल, असा अंदाज आहे.

❑ भारत निम्म्याहून अधिक ऊर्जा दगडी कोळशापासून मिळवतो. कोळसा-खाणींचं व्यवस्थापन करणाऱ्या 'कोल इंडिया'नुसार आपल्याकडचे कोळशाचे साठे पूर्वी समजले जायचे तितके अधिक नाहीत. सध्याच्या विकासदरानुसार हे साठे ८० वर्षं पुरतील. विकासदरात भविष्यात होणारी वाढ गृहीत धरल्यास ते केवळ ३०-४० वर्षांतच संपतील. असं असूनही, अ-पारंपरिक ऊर्जास्रोतांसाठी एकूण ऊर्जाखर्चाच्या अवघ्या १.२८% रकमेची तरतूद केली गेली आहे.

❑ देशाचे अधिकाधिक भाग पाण्याच्या बारमाही टंचाईनं ग्रस्त होत आहेत. भारत हा जगामध्ये भूजलाचा सर्वाधिक अतिउपसा करणारा देश आहे. देशाच्या अनेक भागांत, निसर्गत: होणाऱ्या पाण्याच्या पुनर्भरणाच्या दुप्पट पाणी उपसलं जातं. पाण्याचे साठे सुकून नाहीसे होत असल्यानं भूजलाची पातळी घटत आहे. ह्या घटीचा दर कधीकधी पंजाबातल्यासारखा ३ ते १० फूट प्रतिवर्ष इतका आहे. वाढत्या तापमानामुळे भारतातील पाण्याची दरडोई उपलब्धता २००१मधल्या १८२० घनमीटर प्रतिवर्ष इथून घटत जाऊन २०५०मध्ये ११४० घनमीटर प्रतिवर्ष इतकी होण्याचा अंदाज आहे. पडणाऱ्या पावसाची तीव्रता वाढली, तरी पाऊस पडण्याच्या दिवसांची संख्या तोवर १५नं कमी होण्याची शक्यता आहे.

❑ गेल्या कित्येक दशकांतलं २००९ हे तीव्रतम अवर्षणाचं वर्ष होतं. त्या वर्षी मोसमी पाऊस सरासरीपेक्षा २०%नं कमी झाला. उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग, पंजाब अशा काही कृषि-विभागांत तर तुटीचं प्रमाण ह्याहूनही अधिक होतं. ह्याचे कृषि-उत्पन्नावर गंभीर परिणाम झाले.

❑ शेतीसाठी मातीच्या वरच्या थराचं महत्त्व अनन्यसाधारण असतं. भारतीय कृषि-अनुसंधान परिषदेनुसार (ICAR) भारतातून प्रतिवर्षी प्रतिहेक्टर १६ टन मातीची धूप होते : म्हणजेच सर्व देशातून मिळून ५ अब्ज टन. हा वरचा थर तयार व्हायला कित्येक सहस्रकं लागतात. बंगळुरूच्या आसपासच्या परिसरातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी उपासमार टाळण्यासाठी प्रतिदिन १००० ट्रक शेतमाती वा तलावांतल्या गाळाची माती उकरून, ती बांधकाम-व्यावसायिकांना विकण्यास प्रारंभ केला आहे.

❑ १९९० ते २००० ह्या काळात पुनर्वनीकरणाचा वेग वर्षाला ०.५७% इतका होता. २००० ते २००५ ह्या काळात तो ०.०५% इतका घसरला. भारतातलं 'घनदाट' किंवा 'कमी घनदाट' जंगलांचं क्षेत्र १२%पेक्षाही थोडं कमी आहे. 'खुली जंगलं' वा 'झाडोऱ्या'चं प्रमाणही साधारण तितकंच आहे.

❑ १९८०-८१पासून जितकी जंगल-जमीन अन्य उपयोगांसाठी वर्ग करण्यात आली, त्यापैकी जवळजवळ ५५% वर्गीकरण हे २००१नंतर झालेलं आहे. १९८०-८१नंतर जी जंगल-जमीन खनिजांच्या उत्खननासाठी वर्ग करण्यात आली, त्यापैकी जवळजवळ ७०% वर्गीकरण हे १९९७ ते २००७मध्ये झालं. जागतिकीकरणामुळे पुन्हा एकदा जंगलांच्या उद्ध्वस्तीकरणाला आणि जमिनींच्या अध:पतनाला गती मिळाली. १९८०पूर्वी असे प्रकार बऱ्यापैकी नियंत्रणात होते.

❑ भारत हा जगातल्या प्रचंड जैव-वैविध्य असलेल्या प्रदेशांपैकी एक आहे. १,३०,०००हून अधिक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती इथे आहेत. पिकं आणि पशुधनाचीही प्रचंड विविधता भारतात आहे. पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार वनस्पती आणि प्राण्यांच्या किमान १०% प्रजातींचं अस्तित्व धोक्यात

*(पृष्ठ ४ वर)*

# मोठे समारंभ : सामाजिक दुष्परिणाम

**दिलीप कुलकर्णी**

सध्याच्या समारंभशैलीचे दुष्परिणाम वैयक्तिक आरोग्य आणि निसर्ग ह्यांवर कसे होत आहेत, हे आपण गेले तीन महिने वाचत आहोत. ह्या समारोपाच्या लेखात, व्यक्ती आणि निसर्ग ह्यांच्या मध्ये असणाऱ्या समाज ह्या घटकावर तिचे दुष्परिणाम कसे होत आहेत हे आपण पाहणार आहोत, नि शेवटी आपली कृती कशी असली पाहिजे ह्याचे काही बिंदू सारांशरूपात नोंदवणार आहेत.

ह्यापूर्वी प्रकाशित झालेल्या लेखांवरून आपल्या हे लक्षात आलं असेल की, समारंभांची भव्यता ही मुख्यत: दोन प्रकारांची आहे : एक, साजरीकरणातली, नि दोन, त्यांतल्या आहाराची.

ह्या दोन्ही भव्यतांपायीच समारंभांचा खर्चही 'भव्य' होतो, अन् त्यातूनच विविध सामाजिक समस्यांना प्रारंभ होतो. सर्वांत मोठी समस्या म्हणजे असा खर्च ही हळूहळू एक 'अत्यावश्यक' बाब बनून जाते. पतिपत्नींचं मनोमीलन; दोन परिवारांचं स्नेहाच्या धाग्यांनी बांधलं जाणं; सर्वच बाबतीतल्या 'नातिचरामि'चा संस्कार होणं हा जो विवाहसमारंभाचा उद्देश, तोच पूर्णपणे लोप पावतो. 'ब्रह्मचर्याश्रमाची—म्हणजेच उपभोग अत्यंत संयमित ठेवून ज्ञानार्जनावर सर्व लक्ष केंद्रित करण्याची—सुरुवात' हा जो मुंजीचा उद्देश, त्याचा तर मागमूसही राहत नाही. सगळ्याचं मूल्यमापन फक्त एका सर्वस्वी गैरलागू निकषावर होऊ लागतं : 'खर्च किती केला'! म्हणजेच दुसऱ्या शब्दांत 'किती जास्त उपभोग घेतलात'; किंवा 'किती संसाधनं संपवलीत'; किंवा 'किती जास्त प्रदूषण केलंत'; किंवा 'किती मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण केलात'! म्हणजे संस्कारांना काडीचंही महत्त्व नाही : भपका, डामडौल, उधळपट्टी महत्त्वाची.

ह्यातून दोन वाईट गोष्टी घडतात : लूट आणि स्पर्धा. विशेषत: विवाहांच्या बाबतीत हे प्रकर्षानं घडतं. ग्राहक वाटेल तितका पैसा खर्च करण्यास तयार असतात (स्वेच्छेनं वा अगतिकतेनं) हे ओळखून मंगल-कार्यालयवाले, केटरर, सजावटकार, प्रसाधनकार, मेंदीवाले, फूलवाले, भटजी असे सर्व संबंधित व्यावसायिक त्यांना अक्षरश: लुटतात. कार्यालयाचं एक दिवसाचं भाडं किती असावं; जेवणाच्या एका पानाचा दर किती असावा; मेंदी काढण्यासाठी किती पैसे घ्यावेत... अशा रकमांना काही धरबंधच उरत नाही. 'समारंभ म्हटला की एवढा खर्च येतोच/करायचाच असतो' अशीच सर्वांची मानसिकता बनून गेली आहे; त्यामुळे ह्या खर्चांना ना कोणी आव्हान देतं, ना पर्याय शोधतं.

ह्यातूनच 'अधिक खर्चा'ची एक अघोषित स्पर्धा सुरू होते. 'नातेवाईक, शेजारी, इत्यादींनी जितका खर्च केला असेल, त्याहून मी अधिक खर्च करणार; अधिक भव्यतेनं समारंभ साजरा करणार' असा प्रत्येकाचा खाक्या बनून जातो. ह्यातून होतं असं की, ज्यांचा असा मोठा खर्च करण्याची ऐपत नसते, त्यांनाही खोटी प्रतिष्ठा जपण्यासाठी; किंवा, वरपक्षानं मागणी केल्यामुळे कर्ज काढून तो करावा लागतो. हा एका प्रकाराचा 'सामाजिक दबाव' असतो. आपल्यापाशी पैसे आहेत म्हणून आपण जेव्हा स्वेच्छेनं वारेमाप खर्च करतो, तेव्हा त्यातून एका विकृत सामाजिक प्रथेला आपण प्रोत्साहन देत असतो, हे आपण कधी लक्षात घेतो का? अनेक शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होऊन ज्या आत्महत्या केल्या, त्यांपैकी अनेक ह्या 'मुलीच्या लग्नासाठी काढलेलं कर्ज फेडता येणार नाही' ह्या चिंतेनं झालेल्या होत्या. ते कर्ज शेतीसाठी काढलेलं नव्हतं; तर, नाइलाजानं कराव्या लागणाऱ्या भव्य विवाहसमारंभासाठी काढलेलं होतं. अशा समारंभांची प्रथा निर्माण करणारे श्रीमंत, हे ही मग ह्या आत्महत्यांना कारणीभूत नाहीत का?

अशा भव्य समारंभांतून एकूणच सामाजिक भानाचा अभाव प्रदर्शित होतो. संस्कार, भेटीगाठी, नव्यानं परिचय, आनंदी-उत्साही-मांगल्यपूर्ण वातावरण ह्या गोष्टी राहतात बाजूला, नि भपका, उधळपट्टी, दागिने, साड्या, सूट, बूट, सजावट, पत्रिका, मानपान, देणीघेणी अशा नको त्या गोष्टींनाच अतिरेकी महत्त्व येतं. आपल्या समारंभामुळे जे विविध मोठे आवाज होतात—बोलण्याचे, बँडचे, ध्वनिवर्धकांचे, फटाक्यांचे, गाड्यांच्या हॉर्नचे—त्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्रास होत असेल, ह्याची जाणीव आपण ठेवतो का? ते आपल्याला मनोमन आशीर्वाद देत असतील की शिव्याशाप? समारंभासाठी बाहेरगावच्या सर्व नातेवाईकांनी, स्नेह्यांनी आलं पाहिजे असा सर्व यजमानांचा आग्रह असतो. ह्यात, येणाऱ्याला होणाऱ्या प्रवासाच्या त्रासाची, खर्चाची जाणीव असते का? अशानं जी गर्दी वाढते, तीमुळे अन्य प्रवाशांना होणाऱ्या त्रासाचा विचार असतो का?

समारंभांच्या आयोजनाच्या वेळी अशी विविध 'भानं' आपल्याला येण्याची खूप गरज आहे : पोटाचं भान, समाजाचं भान आणि निसर्गाचं भान. त्या दृष्टीनं आपण काय काय करू शकतो ह्याचे काही मुद्दे संकलितपणे नोंदवू या :

(१) सर्व समारंभ छोटे असावेत. (२) ते साधेपणानं साजरे करावेत. (३) भपका, डामडौल, उधळमाधळ, अपव्यय ह्यांना त्यात थारा नसावा. (४) हौसमौजेला नकार नसला, तरी 'संस्कार' हा जो मूळ उद्देश तो लुप्त होण्याइतकं तिचं प्रमाण नसावं. (५) त्यांचं स्वरूप स्थानिक असावं. (६) समाजाला त्रास तर होऊच नये; उलट, अपव्यय कमी करून त्या पैशांतून सामाजिक संस्थांना/कार्यांना देणग्या द्याव्यात. (७) निसर्गाची हानी सर्वथैव टाळावी; असलेले पैसे निसर्ग-संवर्धनाच्या कामीं लावावेत.

ह्या दृष्टीनं सध्याही काही प्रयत्न होताना दिसतात; त्यांची नोंद घेणं उचित ठरेल. अनेक ठिकाणी 'सामुदायिक विवाहां'चं आयोजन केल्याचं आपण वाचतो. ही एक सर्व दृष्टींनी चांगली प्रथा आहे. 'ज्यांना मोठा खर्च परवडत नाही अशांसाठीची सोय' अशा दृष्टीनं आज अशा समारंभांकडे पाहिलं जातं. ते योग्यच असलं, तरी त्यातली तुच्छतेची छटा जायला हवी. त्यासाठी मोठा खर्च परवडणाऱ्यांनीही आपल्या मुलामुलींची लग्नं अशा सामुदायिक समारंभांत करायला हवीत. 'नोंदणी विवाह' हा पर्याय काहीजण पुढे ठेवतात; पण त्यांत 'संस्कार' नसतो हे एक; आणि त्या विवाहानिमित्त नंतर बऱ्याचदा मोठ्या मेजवान्याही होतातच. मला असं वाटतं की, असे काही वेगळे पर्याय शोधण्याऐवजी सर्वच विवाह/मुंज-समारंभ हे साधे-छोटे व्हायला हवेत. वेगळा प्रवाह निर्माण होण्याऐवजी मुख्यप्रवाहानंच ही तत्त्वं अंगीकृत केली पाहिजेत. मुंजींच्या बाबतीत 'सामुदायिक मुंजी' हा प्रकार नरसोबाच्या वाडीला पूर्वीपासून सुरू आहे. पुण्याच्या 'ज्ञान प्रबोधिनी'त सर्व विद्यार्थ्यांचा—आणि विद्यार्थिनींचाही—व्रतबंध-संस्कार-समारंभ होतो. त्याचं स्वरूप आणि आशय हे दोन्हीही अत्यंत सुयोग्य, सुंदर असं असतं. आपल्या मुलाचा/मुलीचा व्रतबंध-संस्कारही ह्या पद्धतीनं होऊ शकतो.

ग.सं.मध्ये आपण विचार मांडतो ते संपूर्ण जीवनशैलीच्या परिवर्तनाचे. समारंभ हे जीवनाचंच एक अंग आहे, नि म्हणून त्यांच्या शैलीतल्या परिवर्तनाचा आपण ह्या लेखमालेत सविस्तर विचार केला. ज्या वाचकांनी आपल्याकडचे समारंभ छोटे/साधे ठेवले असतील, अशांनी आपले अनुभव ग.सं.कडे अवश्य कळवावेत, ही अखेरीस विनंती.

---

## अ-मंगल कार्यं

## प्रयत्न साध्या समारंभांचे

आमच्या दोन स्नेह्यांनी खूपच साध्या, छोट्या, आगळ्या पद्धतीनं विवाह-समारंभ साजरे केले; त्यांची ही थोडक्यात माहिती.

□ विवेक आणि बागेश्री पोंक्षे हे पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते. विवेक त्या प्रशालेचा प्राचार्य होता आणि आता संस्थेच्या शैक्षणिक संशोधन विभागाचं काम बघतो; तर, बागेश्री ग्रामविकसन विभागात काम करते. विवेक शिवापूरच्या शाळेत शिक्षक होता तेव्हा—२५ वर्षांपूर्वी—त्यांचा विवाह झाला. विवेकनं तोंडीच निमंत्रण दिलं : 'अमुक दिवशी सकाळी लग्नाला आणि नाश्त्याला या.' एक छोटं सभागृह, घरची मंडळी, मोजकेच नातेवाईक आणि स्नेही. ज्ञान प्रबोधिनीच्या पद्धतीनं दीड-दोन तासांचा विवाह-विधी झाला, नि नंतर सर्वांना नाश्ता-चहा. मंडळी १०॥-११ला घरोघर गेली सुद्धा. असे निर्णय घेताना जरा ठाम राहावं लागतं; पण, ह्या जोडप्यानं तो ठामपणा दाखवला.

□ धीरेंद्रभाई आणि स्मिताबेन सोनेजी ह्यांची माहिती 'हरित साधक' ह्या पुस्तकात आहेच. २०११मध्ये त्यांचा मुलगा विश्वेन ह्याचा विवाह झाला. दोन्ही बाजूंनी एकच साधी निमंत्रणपत्रिका सर्वांना पाठवली, ती अशी : 'आमची मुले चि. कूजन आणि चि. विश्वेन ही १ डिसेंबरला विवाहबद्ध होऊन गृहस्थाश्रमात प्रवेश करीत आहेत. ह्या निमित्तानं एकमात्र भेट म्हणून आपण आपले आशीर्वाद व शुभेच्छा पाठवाव्यात. तसेच, त्यांच्या वैवाहिक जीवनाच्या प्रथम वर्षभरात आपण कमीत कमी एक दिवस आमच्या परिवारात येऊन राहावे, हे भावपूर्ण निमंत्रण.' किती छान कल्पना! समारंभ साधा, छोटा. त्यावेळी नीट परिचय होत नाही, म्हणून वर्षभरात सवडीनं केव्हाही येण्याचं निमंत्रण. ह्यातून विकेंद्रीकरण साधलं गेलं. जाणाऱ्यालाही असं जाणं सोयीचं. अनेक समस्यांचा लय करून टाकणारी ही समुचित विवाहशैली मला फार भावली.

*—दि.कु.*

### विक्रांत, मोहिनी पाटील; कुडावळे

एखादे तत्त्व पटल्यानंतर व्यवहारात त्याप्रमाणे वागणे हे पहिल्याच प्रयत्नात जमते असे नाही. पण प्रत्येक असफल प्रयत्नात मन अधिक निश्चयी होत जाते आणि पुढचा प्रयत्न अधिक चांगला होतो. समारंभातील उधळपट्टीला काही अर्थ नाही; उलट, ती आपल्यासाठी हानीकारकच आहे हे लक्षात आल्यावर वेगळ्या प्रकारे समारंभ साजरे करताना आमचेही काहीसे असेच झाले.

आमच्या लग्नाच्या वेळीं काही बाबतीत आम्ही आग्रही राहू शकलो, तर काही गोष्टींत तडजोड केली. मोजक्या निमंत्रितांच्या उपस्थितीत समारंभ करावा अशी आमची इच्छा होती; पण, ही गोष्ट आईबाबांच्या दृष्टीने फार अवघड होती. त्यांच्यावर प्रचंड सामाजिक दडपण आहे असे लक्षात आल्यावर हा आग्रह आम्ही सोडून दिला. तशीच गोष्ट दागिन्यांच्या बाबत घडली. खरे तर आम्ही दोघेही दागिने घालत नाही. पण 'दागिन्यांच्या खरेदीशिवाय लग्न' ही कल्पनाच घरच्यांना काही केल्या पटेना! मग आम्ही दागिन्यांकडे 'बचत' म्हणून पाहायचे ठरवले. 'बँकेत पैसे ठेवण्याऐवजी दागिने ठेवू' असा विचार केला आणि मोजके दागिने खरेदी केले. इतर अनेक गोष्टी मात्र आम्ही आग्रहपूर्वक अमलात आणल्या. निमंत्रणपत्रिका अत्यंत साध्या छापल्या. कपडे रोजच्या वापराला होतील असेच घेतले. लग्नाच्या हॉलची काहीही सजावट केली नाही, किंवा व्यासपीठ बनवलं नाही. मध्यभागी होम मांडून निमंत्रित त्याच्या आजूबाजूला भारतीय बैठकीवर बसले. ध्वनिक्षेपक, फटाके, ढोल-ताशे, छायाचित्रण, ध्वनि/चित्रमुद्रण ह्यांपैकी एकही गोष्ट नव्हती. जेवणाचा बेत अगदी साधाच ठेवला होता. जेवणावळीसाठी स्टीलची ताटे, वाट्या, पेले वापरले. भेटवस्तू न आणण्याबद्दल निमंत्रितांना आग्रहाची विनंती केली होती. बऱ्याचशा लोकांनी ती मानलीही; पण, काही जवळच्या लोकांनी आमच्या नकळत भेटवस्तू घरी पोचवल्याच!

आमची अशी समजूत होती की, समारंभाला येणारी बहुतेक मंडळी नाके मुरडून जाणार. पण, समारंभाच्या साधेपणामुळे वातावरण इतके मंगल झाले होते की, बहुतेकांना आमची कल्पना आवडली. एक पाहुणे तर म्हणाले, ''आजच्या काळातही एवढ्या शांत वातावरणात लग्न होऊ शकते हे दाखवण्यासाठी तरी फोटो घेऊन वृत्तपत्रात बातमी दिली पाहिजे.''

लग्नाच्या बाबतीत आम्ही काही तडजोडी स्वीकारल्या; पण, अंशुलच्या बारशाच्या वेळीं मात्र आम्ही कोणतीही तडजोड केली नाही. फक्त पाच सवाष्ण शेजारणींना बोलावून, साध्या कापडाच्या झोळीत घालून तिचे नाव ठेवले. 'पहिलेच बाळ आणि एवढे साधे बारसे? आम्हाला साधे बोलावणेही नाही!' ह्या कारणाने अनेक नातेवाईक आणि परिचित नाराज झाले. पण, अनेक लोक येण्याने, त्यांनी हाताळण्याने, त्या लहानग्या जीवाला रोगसंक्रमण होऊ शकते आणि हा धोका पत्करायची आमची इच्छा नव्हती.

गेल्या वर्षी आम्ही कुडावळ्यात स्वत:चे घर बांधले. त्याच्या वास्तुशांतीचा कार्यक्रमही अगदी साधेपणाने केला. संस्कार-विधी ज्ञान प्रबोधिनीच्या पद्धतीने समजून घेऊन केला. घराची सजावट म्हणून आंब्याची, फुलांची तोरणे, पांढरी रांगोळी एवढेच वापरले. जेवणासाठी फक्त २-३ निमंत्रित होते. गावातल्या सगळ्या ओळखीच्या लोकांना संध्याकाळी फराळाला बोलावले; तर, बाहेरगावच्या परिचितांना 'आपल्या सवडीने आमचे घरकुल पाहायला नक्की या' अशा आशयाची पोस्टकार्डे टाकली.

समारंभांच्या बाबतीतल्या आमच्या ह्या प्रयत्नांतून आम्हाला जाणवलेल्या ठळक गोष्टी म्हणजे : (१) समारंभ साधेपणाने साजरे करताना त्यातला आनंद घ्यायला जास्त वाव असतो. समारंभाची अवाढव्यता जेवढी वाढेल, तेवढा आपल्यावर मानसिक ताण जास्त आल्याने आपण तर आनंद मनमुराद घेऊ शकतच नाही; पण, आलेली मंडळीही फारशी समाधानी नसतात. कुटुंबीयांमध्ये चांगला संवाद, चर्चा झाल्या तर समारंभ कमी खर्चीक, पण सगळ्यांच्या मनाजोगता होतो. पण हा संवाद नीट नसेल, तर समारंभ अवाढव्य होऊनही सगळेच नाराज राहतात. आमच्या ह्या प्रवासात ही संवादाची कला आम्ही थोडी थोडी शिकतोय. (२) समारंभांत अनैसर्गिक सजावट करण्यापेक्षा नैसर्गिक आणि साध्या पर्यायांचा शोध घेतला, तर कलेचा आनंद आणि सजावट हे दोन्ही साध्य करणारे कितीतरी सोपे पर्याय समोर येतात.

समारंभ साधेपणाने साजरे करण्यामागे लोकांना खडूसपणे टाळणे हा आमचा हेतू निश्चितच नव्हता. उलट, समारंभांतल्या अनावश्यक, खर्चीक आणि कृत्रिम गोष्टी टाळून लोकांचा अकृत्रिम स्नेह जपण्याचा आमचा प्रयत्न आहे.

### पौर्णिमा कुलकर्णी; कुडावळे

खेड्यात जाऊन साधं, कमी गरजांचं, संयमित जीवन जगायचं असं स्वप्न बघत मी आणि दिलीपनं विवाहबद्ध होण्याचं १९८५मध्ये ठरवलं. साहजिकच, आमच्या सहजीवनाची सुरुवात करणारा विवाहाचा समारंभही अगदी साधेपणानं करायचा ह्याबाबत आमचं दोघांचं एकमत होतं.

लग्न ठरवल्यावर साखरपुडा करण्याची आम्हा दोघांनाही गरज वाटत नव्हती. पण रीतीप्रमाणे मुलीला कुंकू लावून ओटी भरणं झालंच पाहिजे ह्याबाबत दिलीपच्या आई आग्रही होत्या, म्हणून मी ते मान्य केलं. पण, दिलीपला ते मान्य नव्हतं; त्यामुळे मग दिलीपचे आई-वडील आमच्याकडे आले आणि वराच्या अनुपस्थितीत आमचा साखरपुडा संपन्न झाला! त्यानंतर लग्नाची बैठक म्हणून जी झाली, ती 'काय काय करायचं, द्यायचं' हे ठरवण्यासाठी नसून 'काय काय करायचं नाही, द्यायचं नाही' हे ठरवण्यासाठी होती. आमचा विवाह आमच्या (कुलकर्ण्यांच्या) राहत्या घरात ज्ञान प्रबोधिनीच्या पद्धतीनं झाला. दोन्हीकडची मिळून ७०-८० निकटची नातेवाईक आणि आप्त मंडळी उपस्थित होती. एका ओळखीच्या मावशींकडून जेवण बनवून आणलं होतं. वाढपाचं काम घरच्या लोकांनीच केलं. लग्नासाठीची कपड्यांची खरेदी म्हणजे मला एक साडी; दिलीपला एक झब्बा-पायजमा; आणि आमच्याकडे बऱ्याच वर्षांपासून कामाला असणाऱ्या बाईंना एक साडी एवढीच. तीच गोष्ट दागिन्यांची. एका मंगळसूत्राखेरीज अन्य कोणताही दागिना घेतला नाही. (किंबहुना, नंतरच्या २८ वर्षांतही आम्ही सोनं खरेदी केलेलं नाही.)

विवाहाच्या दिवशी जरी मर्यादित लोकांनाच बोलावलं होतं, तरी आमच्या आयुष्यातला हा क्षण आम्हाला आमच्या असंख्य स्नेह्यांसह वाटून घ्यायचा होता.

*(पृष्ठ ४ वर)*

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

## हिरवं वाचन

**अजित बर्वे**

| सन | लोकसंख्या | शौचालय वापरणारे | मोबाईल-धारक |
|---|---|---|---|
| २००१ | १०३ कोटी | २२.५ कोटी | १ कोटी |
| २०११ | १२१ कोटी | ३७.५ कोटी | ९१ कोटी |

ही आहे भारत सरकारची अधिकृत आकडेवारी. कोणाही व्यक्तीला उघड्यावर शौचास जायला लागू नये ह्यासाठी संपूर्ण भारतात ११.५० कोटी शौचालये बांधावी लागणार आहेत. भारत सरकारने ह्यासाठीची अंतिम मुदत २०२२ ही ठरवली आहे. हे उद्दिष्ट गाठायचे, तर दरवर्षी किमान १.५० कोटी शौचालये बांधावी लागतील. परंतु, आज त्याची वार्षिक सरासरी आहे ४० लाख. ह्या वेगाने हे उद्दिष्ट गाठायला २०४४ हे वर्ष उजाडेल! (तेही आजचीच लोकसंख्या गृहीत धरली तर.)

ही सर्व आकडेवारी चक्रावून टाकणारी असली, तरी एकूणच ह्या प्रश्नाचा आवाका व समस्येचे गांभीर्य बघितले तर ह्या प्रश्नाकडे सर्वस्वी वेगळ्या दृष्टिकोणातून बघावे लागेल, असे 'मिशन पॉसिबल' हा लेख सुचवतो. ('डाऊन टु अर्थ', जानेवारी १६ ते ३१.) सरकारी अनुदान मिळते म्हणून जी शौचालये बांधली जातात, त्यातील बहुतेकांचा वापर साठवणुकीची खोली म्हणून; किंवा, जनावरांचा चारा व गोवऱ्या ठेवण्यासाठी होतो. पिढ्यानुपिढ्या उघड्यावर शौचाला जाण्याची सवय असलेल्या मोठ्या जनसमुदायाला त्याचे तोटे व शौचालयाचे फायदे समजावून दिले जात नाहीत. मुळातच त्यांची मानसिकता बदलली जात नाही तोवर हा प्रश्न सुटणार नाही.

ह्या प्रश्नावर अतिशय प्रभावीपणे काम करणारी तीन राज्ये सिक्कीम, झारखंड व हरियाणा; तसेच, भारताचे शेजारी बांगला देश व श्रीलंका ह्यांना जर हे शक्य होते, तर इतर राज्यांनाही हे शक्य आहे असा आशावाद लेखक व्यक्त करतो. वरील राज्यांनी ह्या विषयावर घेतलेली आघाडी ही सरकारी अनुदानाशिवाय आहे हे विशेष. हरियाणाच्या फरीदाबाद जिल्ह्याचे आकडे अतिशय बोलके आहेत. २००६ साली जिल्ह्याच्या ग्रामीण भागात २३% घरांमध्ये शौचालय होते. २०१३ साली ह्याची टक्केवारी होती ८४%. संपूर्ण हरियाणात २००१च्या जनगणनेनुसार २९% असलेली शौचालयांची संख्या २०११मध्ये ६६% झाली व आज ७५% आहे. ह्या वेगाने २०१५नंतर हरियाणातील एकाही व्यक्तीला उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येणार नाही. ह्याची सुरुवात झाली सामाजिक स्वच्छता अभियानातून, ज्यामध्ये सरकारी अनुदान हे केंद्रस्थानी न ठेवता स्वच्छता व आरोग्य ह्यांचा संबंध पटवून व्यक्तीच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचे कार्य स्वयंसेवी 'स्वच्छता-दूतां'कडून राबवले गेले. आता हे परिवर्तन व्यापक प्रमाणावर घडवून आणण्यासाठी डॉक्टर, विद्यार्थी, स्वयंसेवक, पुढारी, प्रतिष्ठित मंडळी, अंगणवाडी कार्यकर्ते ह्यांची मदत घेतली जात आहे. फरीदाबादच्या तत्कालीन सहआयुक्तांनी पुढाकार घेऊन ह्याचे प्रारूप बनवले. आज जगातील ५२ देशांमध्ये ही पद्धत वापरली जाते.

सिक्कीम व झारखंड ह्यांचे यशही उल्लेखनीय आहे. २००८ साली सिक्कीम हे देशातील पहिले हागंदारीमुक्त राज्य ठरले. इथे एकाही व्यक्तीस उघड्यावर शौचास जावे लागत नाही. झारखंडासारखे मागास राज्य, जिथे २०११च्या जनगणनेनुसार ९२%हून जास्त लोक उघड्यावर शौचास जात होते, तिथे आज लोक कर्ज घेऊन शौचालय बांधून घेत आहेत. दोन वर्षांत हा आकडा ७४%पर्यंत खाली आला. गरीब म्हटले जाणारे आपले शेजारी बांगला देश व श्रीलंका ह्यांनीही ह्या बाबतीत आघाडी घेतली आहे. तिथे अनुक्रमे ९६% व ९०% जनता शौचालयाचा वापर करते. संपूर्ण भारताची सरासरी अजूनही ४०% अशी शोचनीय आहे. आजारपणातून होणारी मुक्ती व त्यामुळे वाचणारा पैसा हा ह्या राज्यांना आघाडीवर नेणारा कळीचा मुद्दा ठरला आहे.

***अमंगल कार्यं...*** *(पृष्ठ ३ वरून)*

त्यामुळे लग्नानंतर दोन दिवसांनी घराशेजारच्या मोकळ्या जागेत आम्ही एका स्नेहमीलनाचं आयोजन केलं. विनोदी एकपात्री कार्यक्रम आणि शास्त्रीय गायन असे कार्यक्रम आधी झाले, नि नंतर अल्पोपहार. दोन्ही दिवशीच्या कार्यक्रमांना मिळून खूपच कमी खर्च आला आणि दोन्ही कुटुंबांनी मिळून तो केला.

लग्नानंतरचे समारंभ म्हणजे बारशी. दोन्ही मुलांची बारशी पुण्याच्या/पंचनदीच्या घरातच झाली. कुडावळ्याच्या घराची वास्तुशांतही जवळचे नातेवाईक आणि शेजारी अशा २०-२५ जणांच्या उपस्थितीत झाली. गावातल्या लोकांना संध्याकाळी चहा-फराळासाठी बोलावलं होतं. गावकऱ्यांशी परिचय व्हावा असा त्यामागे हेतू होता.

मुलांच्या मुंजीचे 'समारंभ' करणं आम्हाला मुळीच मान्य नव्हतं. त्यामुळे दोघांच्याही मुंजी कुडावळ्याच्या घरातच झाल्या. मुलांना 'हा संस्कार कशासाठी' हे आधीपासून सांगत राहून, ज्ञान प्रबोधिनीच्या पद्धतीनं मुंजी झाल्या. दोन्ही वेळी सुमारे २० जणच उपस्थित होते. बारशी, वास्तुशांत, मुंज ह्या कार्यक्रमांसाठी आम्ही आमचे आई-वडील आणि सक्खे बहीण-भाऊ सोडता बाहेरगावच्या नातेवाईक/स्नेह्यांना बोलावणं केलं नाही. अशा समारंभांसाठी लोकांनी वेळ आणि पैसा खर्च करून यावं हे आम्हाला कधीच पटलं नाही. आणि आमचा तरी अनुभव असा आहे की, आमच्या अशा भूमिकेमुळे आमचे नातेसंबंध दुरावले असं अजिबात घडलं नाही. आमचे सर्व नातेवाईक त्यांच्या सवडीनं आमच्याकडे येतात आणि आम्हीही सगळ्यांकडे जातो.

आमच्या आयुष्यातल्या समारंभांच्या साधेपणाबाबत आम्ही आग्रही राहिलो. इतरांनीही ते तसे करावेत अशी आमची इच्छा असते; पण, ते शक्य होतंच असं नाही. अनेकदा नातेवाईक किंवा स्नेहीजनांकडची कार्यं चालीरीतीप्रमाणे झगमगाटी होतात. आम्ही आमची मतं त्यांच्यावर लादत नाही; पण, त्यांत सहभागी होणं मात्र नाकारतो. बाहेरगावी असणाऱ्या समारंभांना मुद्दाम प्रवास करून जाणं टाळतो : केवळ पत्राद्वारे शुभेच्छा देतो. अगदीच जवळचं नातं असल्यामुळे समारंभाला जाणं आवश्यक असेल, तर समारंभाला उपस्थित राहतो; पण, जेवायला मात्र थांबत नाही. पूर्वी भिडेखातर आम्ही अशा समारंभांना जायचो; पण, आता मात्र असा नकार देणं आम्हाला जमायला लागलंय. समारंभाला गेलो नाही, तरी त्यानंतर त्या भागात प्रवास घडेल तेव्हा आवर्जून त्या नातेवाईक किंवा स्नेह्यांकडे जातो, त्यामुळे स्नेहबंध न तुटताही तत्त्वांचं आचरण शक्य होतं.

***जागतिकीकरण...*** *(पृष्ठ २ वरून)*

आहे. जर २°से.ची तापमानवाढ झाली, तर भारताला १५ ते ४०% प्रजाती गमवाव्या लागतील. जंगलांनी आच्छादिलेल्या डोंगरांच्या घळीत धरणं बांधून पाणी साठवण्यामुळे कित्येक जंगलं, तसंच जैव-विविधतेनं समृद्ध नैसर्गिक परिसंस्थांचा नाश झाला आहे. जलवीज आणि उत्खनन ह्यांसाठीच्या योजनांमुळे होणारी जंगलतोड हा जैववैविध्याला असलेला प्राय: सर्वांत मोठा धोका आहे. देशातल्या अनेक देवराया वा प्राणी-पक्ष्यांच्या प्रजातींचं संरक्षण ग्रामीण लोक परंपरेनं करत आलेले आहेत. आर्थिक विकासाच्या हल्ल्यामुळे अशी अनेक जनरक्षित निसर्गक्षेत्रं धोक्यात आहेत.

❏ भारताची सुमारे ७०% लोकसंख्या ही उपजीविकेसाठी भूमीशी संबंधित व्यवसाय, जंगलं, जलाशय वा समुद्र ह्यांवर अवलंबून आहे. पाणी, अन्न, इंधन, निवारा, चारा, औषधं : सारं काही त्यांना ह्या परिसंस्थांपासूनच मिळतं. माणसाची उपजीविका भागवण्यामध्ये सुमारे १०,००० वनस्पती-प्रजाती आणि शेकडो प्राणी-प्रजाती एवढ्या जैविक-विविधतेचं सहकार्य असतं. २७.५ कोटी जनता आपल्या उपजीविकेसाठी काष्ठेतर वनोपजांवर अवलंबून असते. ह्या परिसंस्थांच्या विनाशाचा थेट परिणाम ह्या लोकांची उपजीविका आणि जीवनं ह्यांवर होतो.

❏ भारताच्या ७५०० कि.मी. लांबीच्या सागर-किनाऱ्यावर १२ मोठी आणि १८५ लहान बंदरं आहेत. त्याशिवाय दशको तेलशुद्धीकरणाचे कारखाने, पेट्रोरसायनांचे वा अन्यान्य घातक प्रकल्पही किनाऱ्यावर आहेत. किनाऱ्यांची आणि सागरी परिसंस्थांची हानी करणारे असे अनेक प्रकल्प नियोजित आहेत.

❏ केंद्रीय प्रदूषण-नियंत्रण मंडळाच्या अनुसार भारताच्या किनारपट्टीवरची १८७ शहरं प्रतिदिन ५.५ अब्ज लिटर सांडपाणी समुद्रात सोडतात. ह्याच किनारपट्टीवर २५ कोटी लोक राहतात. त्यांपैकी बरेच जण ३६०० कोळीवाड्यांमध्ये राहणारे आहेत. ह्या किनाऱ्यांवर ४००० चौ.कि.मी.ची खारफुटीची जंगलं आहेत. ती किनारपट्ट्यांचं आणि माणसांचं चक्रीवादळांच्या तडाख्यापासून संरक्षण करतात. आर्थिक वाढीसाठी संसाधनांची मागणी वाढल्यानं मासेमारीसारखे उपजीविकेचे पारंपरिक व्यवसाय आणि नाजूक सागरी परिसंस्था ह्या दोन्हींवरचा दबाव वाढला आहे आणि त्यामुळे ते धोक्यात आले आहेत.

❏ २००५मध्ये भारतात १,४६,००० टन इलेक्ट्रॉनिक कचरा तयार झाला. २०१२पर्यंत हे प्रमाण ८ लक्ष टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. १९९२मधील 'बेसल कन्व्हेंशन'नुसार सर्वोच्च न्यायालयानं १९९७मध्ये घातक कचरा आयात करण्यावर बंदी घातली. तरीही, 'पुनर्वापरक्षम द्रव्यां'च्या नावाखाली ई-कचरा देशात प्रवेश करतोच आहे. गेल्या काही वर्षांत पर्यावरण आणि वन मंत्रालयानं अनेक उद्योगांना सहस्रो टन विषारी ई-कचरा भारतात आयात करण्याचे परवाने दिले आहेत.

❏ जागतिकीकरणाच्या काळात अनेक प्रकारच्या घातक आणि विषारी कचऱ्याची आयात प्रचंड प्रमाणात वाढली आहे. उदाहरणार्थ, प्लॅस्टिकच्या कचऱ्याची आयात २००३-४मधल्या १,०१,३१२ टनांवरून २००८-९मध्ये ४,६५,९२१ टन झाली. देशात ज्या हजारो टन धातुरूप कचऱ्याची आयात होते, त्यात आफ्रिका आणि पश्चिम आशियातल्या युद्धांमधला धातुमय कचराही असतो. त्यात कधीकधी जिवंत स्फोटकांचाही समावेश असतो. धातूंचं पुनर्घटन करताना कारखान्यांमध्ये त्यांचा स्फोट झाल्याच्या घटना अधूनमधून सतत घडत असतात.

❏ 'कल्पवृक्ष' ह्या पर्यावरण-कृतिगटाच्या अनुसार भारत सरकार प्रतिदिन ३ ह्या वेगानं उत्खननाच्या, औद्योगिक व संरचनात्मक प्रकल्पांना मंजुरी देतं! ह्याशिवाय, हे लिखाण चालू असण्याच्या काळात (२०११-१२) सरकारकडे ६०००हून अधिक प्रकल्पांवर लक्ष ठेवण्याचंही काम होतं. हे काम ६ विभागीय कार्यालयांकरवी केलं जातं. प्रत्येक कार्यालयात केवळ ४ ते ६ अधिकारी असतात. पार्यावरणिक मंजुरी दिलेल्या प्रकल्पांचं मूल्यमापन ३-४ वर्षांतून एकदा केलं जातं. ह्या परिस्थितीमुळे, पर्यावरणविषयक कायद्यांचं पालन ही बाब दुर्मीळ बनली आहे. पार्यावरणिक मंजुरी मिळणं सोपं व्हावं म्हणून गेल्या दशकभरात संबंधित अधिसूचनांमध्ये ३०हून अधिक बदल केले गेले आहेत. हे बदल म्हणजे अटींमधली शिथिलताच आहे. ह्या अधिसूचना पार्यावरणिक आघात-पडताळणी, सागरकिनाऱ्यांचं नियमन अशांसारख्या विषयांबाबतच्या आहेत.

❏ विभिन्न क्षेत्रांत नेत्रदीपक वाढ साध्य होऊनही पर्यावरणविषयक कामं आणि नियंत्रण ह्यांसाठी थेट अर्थसंकल्पीय तरतूद सदैवच कमी (१% हूनही कमी) राहिली आहे. २००९-१०च्या अर्थसंकल्पातली तरतूद ही आजवरची सर्वांत कमी होती.

### पर्यायांचा शोध

❏ भारतात सामाजिक आणि पर्यावरणविषयक जागृती, तसंच विविध ठिकाणचे जनसमूह आणि जोरकस 'विकासा'मुळे बाधित झालेले नागरिक ह्यांनी चालवलेल्या चळवळी ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं अनुभवाला येत आहे. आपल्याकडे आवश्यक पर्यायांची जराही कमतरता नाही. धारणाक्षम शेती, विकेंद्रित पाणी-साठवणूक व पुरवठा, ग्रामीण उद्योगीकरण, नवीकरणक्षम ऊर्जा, उपयोगी शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, धारणाक्षम शहरी राहणी, जनसमूहांचं स्वयंशासन, जैवक्षेत्रीय नियोजन, सामूहिक प्रसारमाध्यमं, उत्पादन आणि वितरणाची लोकतांत्रिक व्यवस्था, इत्यादींबाबतचे अक्षरश: सहस्रो पर्याय सध्याही उपलब्ध आहेत.

❏ भारतभर चाललेल्या प्रतिकाराच्या चळवळींनी विध्वंसक अशा 'विकास'-प्रकल्पांना आव्हान दिलं आहे. त्यामुळे अनेक सेझ-प्रकल्प, धरणं, खाणी, इत्यादींवर बंदी आली आहे, किंवा त्यांचं काम लांबणीवर पडलं आहे. 'आमच्या परिसरात नको' हा आग्रह सार्वत्रिक होत आहे; आणि त्याचबरोबर कृतिशील सामाजिक जागृतीमुळे 'कुठेच नको' अशीही मागणी आता वाढीला लागली आहे.

❏ सामाजिक चळवळींच्या मागणीला प्रतिसाद म्हणून सरकारनंही काही प्रागतिक असे निर्णय घेतले आहेत. त्यात धोरणबदल, नव्या योजना; तसंच, माहिती-अधिकाराचा कायदा, वनहक्क कायदा, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (आणि योजना) अशा कायद्यांचाही समावेश आहे.

**सौर दिनदर्शिका** — सौर आषाढ, शके १९३६ (जून-जुलै २०१४)

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १ 22 जून | २ 23 | ३ 24 | ४ 25 | ५ 26 | ६ 27 | ७ 28 |
| ८ 29 | ९ 30 | १० 1 | ११ 2 | १२ 3 | १३ 4 | १४ 5 |
| १५ 6 | १६ 7 | १७ 8 | १८ 9 | १९ 10 | २० 11 | २१ 12 |
| २२ 13 | २३ 14 | २४ 15 | २५ 16 | २६ 17 | २७ 18 | २८ 19 |
| २९ 20 | ३० 21 | ३१ 22 जुलै | | | | |

**गतिमान संतुलन**

❏ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❏ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❏ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिनाअखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❏ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❏ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❏ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले. संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

**पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)**

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३० डाकघरातून; दरमहा दि.२१ला

पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2012-14
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना क्र. : WPP-13

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिठ्ठीवरचा कालावधी **जून१४** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक — कालावधी पर्यंत

**प्रति**

प्रेषक — गतिमान संतुलन, कुडावळे ४१५७१२, ता. दापोली, जि. रत्नागिरी